महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्र.संकीर्ण-२०१४/२१९/१४/म.शि.३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ५ सप्टेंबर, २०१४.

प्रति,
संचालक,
उच्च शिक्षण पुणे.

विषय : मराठा व मुस्लीम आरक्षणाबाबत

संदर्भ :१) शासन, सामान्य प्रशासन विभाग, सन २०१४ ची महाराष्ट्र अधीसूचना क्रमांक २९, दिनांक ०९.०६.२०१४
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र. ३५/मावक, दिनांक १५.०७.२०१४
३) अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक-अविवि-२०१४/प्र.क्र. ८१/का-७, दिनांक १९.७.२०१४

उपरोक्त विषयी संदर्भाधीन शासन अधिसूचना व शासन निर्णय यांचे अवलोकन करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी संदर्भाधीन शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५.०७.२०१४ व अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक- अविवि-२०१४/प्र.क्र. ८१/का-७, दिनांक १९.७.२०१४ च्या अनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्थ असणा-या सर्व विभागीय सहसंचालक /सर्व महाविद्यालये/ संस्था यांना योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना तातडीने देण्यात याव्यात व याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(किरण जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पनवेल,पुणे, कोल्हापूर, सोलापूर, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती व नागपूर

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे 411 001

Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं . ०२०/२६१११११५३


क्र. एनजीसी/२०१४/संकीर्ण/३७०५०/मविर-३/ ७५५७ दिनांक - ५/९/२०१४

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय - सन २०१४-१५ चा अध्यादेश क्रमांक १३ व सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १४ च्या अनुषगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती**

**संदर्भ -** १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक एनजीसी/२०१४/संकीर्ण/३६८८२मविर-३/७४९३ दिनांक ४ सप्टेबर २०१४

२. शासन पत्र क्रमांक संकीर्ण १११४/प्र.क्र.३०९/विशि-३ दिनांक १ सप्टेंबर २०१४

उपरोक्त संदर्भांकित पत्र क्रमांक १ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक १५/७/२०१४ आणि अल्पसंख्यांक विभाग शासन निर्णय दिनांक १९/७/२०१४ नुसार आपल्याअधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना अवगत करण्याविषयी सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भिय शासन पत्र क्रमांक २ ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्रान्वये कळविल्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या पत्राच्या अनुषंगाने सन २०१३ चा अयदो क्रमांक १३ व सन २०१४ चा अध्यादेश क्रमाक १४ च्य संदर्भाती तक्ता क्रमांक ३ च्या बाबत शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये ESBC व SBC-A या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशाची माहिती न्यायालयीन प्रकणासाठी आवश्यक असल्याने तात्काळ उपलब्ध करुन देण्याविषयी कळविण्यात आले आहे. सदर शासन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या विभागातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात ESBC व SBC-A या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१४ या वर्षासाठी दिलेल्या प्रवेशांची महिती खालील तक्त्यात तात्काळ विनाविलंब देण्यात यावी.

| अध्यासक्रमाचे नांव | ESBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशांची संख्या | SBC-A प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशांची संख्या |
|---|---|---|
| | | |

वरील माहिती न्यायालयीन प्रकरणासाठी आवश्यक असल्याने व हे न्यायालयीन प्रकरण राज्याच्या मागास प्रवर्गाच्या आरक्षण धोरणाशी निगडीत असल्याने माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.

दिनांक १५/७२०१४ व दिनांक १९/७/२०१४ चे शासन निर्णय सर्व अशासकीय महाविद्यायांना शासनाच्या वेबसाइटवरुन काढून घ्यावेत असे कळवावे व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी विद्यार्थी प्रवेश व सरळसेवेने पदे भरणंसाठी करावी विभागीय सहसंचालक यांचेकडून शिक्षक/शिक्षकेतर पदे भरण्यास एनओसी दिली जाते. याही

शासन निर्णयाच्या समावेशासह आरक्षण बिंदू नामावली प्रमाणीत केलेली असल्याशिवाय एनओसी देवू नये. विद्यापीठातही पदे भरली जातात. त्यासाठी या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेची कार्यवाही करणेबाबत कुलसचिव, अकृषि विद्यापीठ यांना लेखी कळवावे. सर्व महाविद्यालयांना व आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठास कळवून, सर्व महाविद्यालयांना कळविलेले आहे. सदरचे आदेशानुसार कार्यवाही करुन घेत आहोत असे प्रमाणपत्र या कार्यालयास द्यावे.

५/१/२०१५

(डॉ. प्र. रा. गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत - १. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठ,
२/- यांना आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित
२. स्नेहा न. जोशी, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२ यांना संदर्भिय पत्र क्रमांक २ च्या अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर